शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या "स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)" राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन दि. १८ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. सर्वत्र स्वच्छता, सफाई रहावी व राज्य हागणदारीमुक्त रहावे, याकरिता भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनातर्फे विविध कार्यक्रम/अभियान आयोजित करणत येत आहेत. या कार्यक्रमांमध्ये च्स्वच्छता ही सेवाछ हा कार्यक्रम प्रामुख्याने राबविला जात आहे.

या अनुषंगाने मंत्रीमंडळ बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी शासकीय व निमशासकीय कार्यालयात कायम स्वच्छता राहील व आनंदी वातारवण राहील या अनुषंगाने स्वच्छता पंधरवडा राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सदर स्वच्छता पंधरवडा उच्च शिक्षण विभागाने सर्व क्षेत्रीय कार्यालयातराबविण्याच्या अनुषंगाने संदर्भांकित परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर सूचनांनुसार दि. १३.१०.२०१८ ते २८.१०.२०१८ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा साजरा करण्याबाबत आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचनाबाबत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि-१/स्वच्छता पंधरवडा/परिपत्रक २०१८/१७४९६ दिनांक. ११/१०/२०१८ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 149
दि. 12 ऑक्टो. 2018

d:\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune E-Mail : mavi.dhepune@nic.in
फ़ोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३.
क्र.: उशिसं//मवि-१/स्वच्छता पंधरवडा/परिपत्रक२०१८/६४९६ दिनांक: ११.१०.२०१८

Shivaji University, Kolhapur
Pro-Vice-Chancellor Office
Date :- 12 OCT 2018
Inward No. :- 5488
To Whom :- PVC PA

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीटे
महाराष्ट्र राज्य.

विषय:कार्यालयीन स्वच्छता पंधरवडा साजरा करणेबाबत..

संदर्भ: शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नोंदणी शाखा दि. ९.१०.२०१८

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकन करावे.

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या "स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)" या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन दि. १८ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. सर्वत्र स्वच्छता, सफाई रहावी व राज्य हागणदारीमुक्त रहावे, याकरिता भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनातर्फे विविध कार्यक्रम/अभियान आयोजित करण्यात येत आहेत. या कार्यक्रमांमध्ये "स्वच्छता ही सेवा" हा कार्यक्रम प्रामुख्याने राबविला जात आहे.

या अनुषंगाने मंत्रीमंडळ बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी शासकीय व निमशासकीय कार्यालयात कायम स्वच्छता राहील व आनंदी वातावरण राहील या अनुषंगाने स्वच्छता पंधरवडा राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सदर स्वच्छता पंधरवडा उच्च शिक्षण विभागाने सर्व क्षेत्रीय कार्यालयात राबविण्याच्या अनुषंगाने संदर्भांकित परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर सूचनांनूसार दि. १३.१०.२०१८ ते २८.१०.२०१८ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा साजरा करण्याबाबत आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

DY R ADMT2
12/10

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत: मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

कार्यालयीन स्वच्छता पंधरवडा
साजरा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४ /नोंदणी शाखा
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ९ ऑक्टोबर, २०१८.

वाचा :

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: स्वभामि-२०१८/ प्र.क्र.५१५/पापु-१६,दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८

शासन परिपत्रक:

मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरु असलेल्या "स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) " या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य हागणदारीमुक्त म्हणून घोषित केले आहे. सर्वत्र स्वच्छता, सफाई रहावी व राज्य हागणदारीमुक्त रहावे, याकरिता भारत सरकार, तसेच महाराष्ट्र शासनातर्फे विविध कार्यक्रम/ अभियान आयोजित करण्यात येत आहेत. या कार्यक्रमांमध्ये "स्वच्छता ही सेवा", कार्यक्रम प्रामुख्याने राबविला जात आहे.

या अनुषंगाने मंत्रिमंडळ बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी शासकीय व निमशासकीय कार्यालयात कायम स्वच्छता राहील व आनंदी वातावरण राहील या अनुषंगाने स्वच्छता पंधरवडा राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने त्यांच्या दिनांक ६.१०.२०१८ च्या परिपत्रकान्वये शासकीय व निमशासकीय कार्यालयात दिनांक १३.१०.२०१८ ते २८.१०.२०१८ या दरम्यान स्वच्छता पंधरवडा राबविण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर स्वच्छता पंधरवडा उच्च व तंत्रशिक्षण विभाग (खुद्द) व विभागच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयात राबविण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) मंत्रालयातील विभागाच्या कार्यालयात तसेच विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय शासकीय कार्यालयीन जागा ही नेटनेटकी व सुटसुटीत ठेवण्यात यावी. कार्यालयातील छन्नमार्ग (पॅसेज) तसेच पाय-यांवर स्वच्छता राखून सदर मार्गात कोणतीही कार्यालयीन वस्तू तसेच दस्तऐवज ठेवण्यात येऊ नयेत.

२) कार्यालयातील जागेत पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी नस्ती, ऑफीस फाईल्स, कागदपत्रे इत्यादी सुयोग्य पध्दतीने ठेवण्यात यावीत. कार्यालयातील पंखे, टेबल, खुर्च्या, कपाटे, रॅक्स यासारखी साधने तसेच कार्यालयीन परिसर इत्यादी ठिकाणची जागा नेहमी स्वच्छ व टापटीप राहील याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी घ्यावी.

३) कार्यालयात येण्याजाण्याचा मार्ग स्वच्छ राहील याची देखील दक्षता घेण्यात यावी. स्वच्छतेच्या अनुषंगाने इतर विभागाच्या समन्वयाची आवश्यकता भासल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाशी संपर्क साधून निराकरण करण्यात यावे. कार्यालयीन परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी विनावापरातील फर्निचर, विद्युत उपकरणे, जडवस्तू याची विल्हेवाट लावण्यात यावी.

४) कार्यालयीन अभिलेख तसेच दस्तऐवजांचे नियमानुसार निंदणीकरण करण्यात यावे व अनावश्यक कागदपत्रे नियमानुसार नष्ट करण्यात यावीत.

५) सर्व संचालक तसेच क्षेत्रिय कार्यालय प्रमुखांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ६.१०.२०१८ च्या परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीशी संपर्क साधून सदर सूचनांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी.

६) दिनांक १३.१०.२०१८ रोजी दुस-या शनिवारी (शासकीय सुट्टी) सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी नेहमीप्रमाणे आपआपल्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून वर उल्लेखिलेली स्वच्छतेची व कागदपत्र निंदणीकरणाची कामे करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक .२०१८१०१०१४५९२०२५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे..

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatraya Rambhau Kahar

Digitally signed by Dattatraya Rambhau Kahar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc29789a0057acb8ed170e1748553c17db300239c347be5264aff5eb51fcac, cn=Dattatraya Rambhau Kahar
Date: 2018.10.10 15:04:57 +05'30'

(द. रा. कहार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई